जल जीवन मिशन अंतर्गत सर्वसाधरण (राज्य हिस्सा) घटकाखालील निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला वितरित करणेबाबत (लेखाशीर्ष २२१५ २०७१)

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जजीमी-२०२०/प्र.क्र.११०/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: १ मार्च,२०२१

वाचा-

१. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजीमि -२०२०/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७), दि.०४.०९.२०२०**
२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जेजेएम -२०२०/ प्र.क्र.९५/ पापु १०, दि.२४.०९.२०२०
३. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जेजेएम-२०२०/ प्र.क्र.११० (२)/ पापु १०, दि.३०.१२.२०२०

प्रस्तावना-

संदर्भिय क्र.१ च्या दि.०४.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाकरीता सर्वसाधरण घटकांतर्गत (राज्य हिस्सा) लेखाशीर्ष २२१५ २०७१ खाली यापूर्वी संदर्भिय क्र.२ व ३ अन्वये (अनुक्रमे रु.७५.०० कोटी व रु.२०० कोटी) एकुण रु.२७५.०० कोटी इतका निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला वितरित करण्यात आला आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत सर्वसाधरण घटकांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त रु.२७७.३९६१८६ कोटी इतका केंद्र हिश्श्याचा निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला वितरित करण्यात आला असून त्या समरुप राज्य हिश्श्याचा निधी वितरणास उपलब्ध व्हावा याकरीता राज्य हिश्श्याच्या लेखाशीर्षाखाली वित्त विभागाने उर्वरित रु.२.३९६१८६ कोटी इतका निधी वितरणास उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला उपलब्ध करुन देण्याकरीता सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीच्या राज्य नोडल खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

**<u>शासन निर्णय-</u>**

जल जीवन मिशन अंतर्गत सन २०२०- २०२१ या आर्थिक वर्षामध्ये सर्वसाधारण घटकांतर्गत (राज्य हिस्सा) मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१, पाणी पुरवठा, १०२, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, (०२), जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (१५) नळाव्दारे पाणी पुरवठा योजना- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यकम यासाठी अनुदान (राज्यक्षेत्र), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) (२२१५ २०७१) या लेखाशिर्षाखाली रु.२,३९,६१,८६०/- (अक्षरी-रु. दोन कोटी एकोणचाळीस लक्ष एकसष्ट हजार आठेश साठ फक्त) इतका निधी वित्त विभागाने वितरणास उपलब्ध करुन दिलेला आहे. हा निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीकरीता उघडण्यात आलेल्या राज्य नोडल खात्यामध्ये वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी तात्काळ राज्य पाणी व स्वच्छता मिशन (जल जीवन मिशन) या नावाने उघडण्यात आलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, मुंबई (IFSC Code- SBIN००००३००) येथील खाते क्र.३९२२२५४८२४२ मध्ये जमा करण्यात यावा. हा निधी जमा झाल्यानंतर पुढील सर्व आवश्यक कार्यवाही मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्याद्वारे करण्यात यावी.

२. सदर रक्कम आहरित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी अवर सचिव (रोखशाखा) (श्री.पां.रा.खोटरे) यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव (श्री.रा.म.गेंगजे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम (श्री.पां.रा.खोटरे) आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोखशाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, मुंबई (IFSC Code- SBIN००००३००) येथील खाते क्र.३९२२२५४८२४२ मध्ये जमा करावी.

३. प्रस्तुत प्रकरणी वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं २०२०/ प्र.क्र.६४/अर्थ-३, दि.१६.०४.२०२० सोबतच्या परिशिष्ठातील अनुक्रमांक १ ते ८ व क्र.९ मधील तपासणी सूचीतील अ.क्र.१ ते १० मधील अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचे अनौ.संदर्भ क्र.६७/व्यय-३, दि.१७.०२.२०२१ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३०११७१३२१४६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.03.01 17:36:30 +05'30'

**(सरोज देशपांडे)**
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. श्री.रा.म.गेंगजे, उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२.श्री.पां.रा.खोटरे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई

यांना विनंती करण्यात येते की, वरीलप्रमाणे निधी तातडीने स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई येथील राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या खात्यात जमा करण्यात यावा.

**प्रत,**

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. महालेखापाल (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई/ २- नागपूर
४. मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
५. सह सचिव/ उप सचिव (अर्थसंकल्प), नियोजन व वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
८. कार्यासन पापु-०४/२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
९. निवडनस्ती- कार्यासन पापु १०